# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकमत पुणे, बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०१५ ५

**प्लॅस्टिक मुक्त अभियान : राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम**

### राजगुरुनगरमध्ये ७ हजार कागदी पिशव्यांचे वाटप

राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने काल प्लास्टिक मुक्त अभियानाचे आयोजन केले आणि राजगुरुनगरमध्ये सुमारे ७ हजार कागदी पिशव्यांचे वाटप केले. यात राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, राजगुरुनगर नगर परिषदेचे नगराध्यक्ष बापूसाहेब थिगळे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते या अभिनव अभियानचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळुक, प्रा. रुपाली वायाळ, प्रा. मच्छिंद्र मुळुक, डॉ. महेश घाडगे, विद्यार्थी प्रतिनिधी आकाश नवरे, काजोल बोराडे उपस्थित होते. प्लास्टिक पिशव्या व वस्तूंच्या दुष्परिणामांची नागरिकांना माहिती व्हावी आणि त्यांनी प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर न करता, कापडी अथवा कागदी पिशव्यांना प्राधान्य द्यावे, यासाठी या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

प्लास्टिक पिशवी वजनाने हलकी, टिकाऊ आणि सहज उपलब्ध होत असल्याने तिचा वापर आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे; परंतु तिच प्लास्टिक पिशवी टाकाऊ झाल्यावर तिचे विघटन होत नसल्याने ती नष्ट होत नाही. परिणामी नदी-नाल्यात आढळणारा प्लास्टिक कचरा आणि गल्लीबोळात कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर प्लास्टिक पिशव्यांचे वाढते प्रमाण चिंता करायला लावणारे आहे. यामुळे गटारे तुंबण्यापासून अस्वच्छता, आजार प्रदूषण, परिसराची सौंदर्यहानी अशा अनेक समस्या निर्माण होतात. त्यासाठी सर्व नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन आपले शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन मुख्याधिकारी सचिन सहस्त्रबुद्धे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. दिलीप मुळुक यांनी आभार मानले.

(वार्ताहर)



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्लॅस्टिक मुक्त अभियानाचे उद्घाटन करताना अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, नगराध्यक्ष बापूसाहेब थिगळे, मुख्याधिकारी सचिन सहस्त्रबुद्धे व आदी.

**प्लॅस्टिकमुळे आजार वाढण्याची शक्यता**

- दुकानात तसेच विविध शॉपमध्ये मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचा वापर वाढला आहे. शासनाने ठरवून दिलेले निकष पाळले जात नाही. या प्लस्टीक बॅगचा वापर झाल्यावर त्या कच-यात फेकून दिल्या जातात. यामुळे पाणी एका जागी साचून आजार बळावण्याची शक्यता असते.

- एसटी स्थानक परिसरातील किरकोळ विक्रेते उत्तम ढोरे, बबन लोणकर, सरिता भवारी यांना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात कागदी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.
- कागदी पिशव्यांचे वाटप करताना संपूर्ण राजगुरुनगरमधील विक्रेत्यांनी सहकार्य करुन आपल्याकडील प्लास्टिक पिशव्या उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांकडे जमा केल्या.
- या उपक्रमाचे या परिसरातील नागरिकांनी स्वागत केले. यावेळी प्लॅस्टीकमुक्तीसाठी कार्यकर्त्यांनी जनजागृती केली.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख